Val II, Issue:VIII, Sept 2012
ISSN : 2230-7850

# Indian Streams Research Journal

Impact Factor 0.2105

## Monthly Multidisciplinary Research Journal



Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N. Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 8, Sept 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# जागतिकीकरणाचे भारतीय सामाजिक संस्थेतील प्रतिबींब

मिलींद रा. जांभुळकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख
जनता महाविद्यालय, चंद्रपूर.

जागतिकीकरणाचा मुळातच संबंध आर्थिक बाबीशी आहे. पण खरोखरच जागतिकीकरणाने गरीब–श्रीमंत ही दरी कमी होणार आहे काय? जागतिकीकरणामध्ये नेमके काय अभिप्रेत आहे. जगातील सर्वांना रोजगार, शिक्षण, आरोग्य या बाबतच्या सुविधा प्राप्त होतील काय? जागतिकीकरणात बहुरा□ट्रीय कंपन्या जास्तीत जास्त नफा एवढाच विचार करीत आहे. अशा वेळेस भारतीय समाजव्यवस्थेचा विचार करता जागतिकीकरणाने काय साध्य झाले. भारतातील सामाजिक संस्थावर काही परिणाम झाले काय? एकूणच प्रतिबींब विचारात घेणे एक संशोधनाचा *विषय* आहे.

*पाश्चात्य देशांतील शासनानी लोकांच्या हिताचा बळी देऊन जागतिकीकरण केलेले नाही. जागतिकीकरण करतांना त्यांनी लोकांच्या जीवनमानाचा स्तर वाढविण्याकडे लक्ष दिले. सध्याच्या जागतिक स्पर्धेत कोणासही फुकट काही मिळणार नाही. सध्या जग अत्यंत द्रुतगतीने बदलत आहे. तंत्रज्ञानामुळे हे घडुन येत आहे. जागतिकीकरणाने आपल्या देशात नवे रोजगार निर्माण होतील आणि वस्तुंच्या किंमती खाली येतील हे जे समीकरण सांगण्यात आले होते. त्याचे प्रत्यंतर मात्र कुठेही दिसत नाही. केवळ आपण जागतिकीकरणाच्या स्वप्नरंजनात गुरफटलेलो दिसून येतो.*

*आज जागतिक बाजारपेठेच्या 30टक्के हिश्शावर पाच मोठया बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपले प्रभुत्व प्रस्थापित केलेले आहे. आणि दुय्यम कंपन्यांनी देखील आपली पकड निर्माण केली. परिणामतः वस्तुंच्या किंमती ठरविण्याचा अधिकार आपोआपच त्यांच्याकडे गेला जगाच्या एकुण लोकसंख्येपैकी निम्म्या लोकसंख्येपाशी जेवढी संपत्ती आहे तेवढी संपत्ती केवळ 358 जणांच्या हातात केंद्रीभूत झालेली आढळून येते. याची कबूली संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यक्रमात दिलेली आहे. याचाच अर्थ अमेरिका असो व भारत जागतिकीकरणाच्या नावाखाली उद्योगक्षेत्राचे वर्चस्व प्रस्थापित झालेले दिसून येते. सर्वसामान्य जनतेचा विचार केल्यास जागतिकीकरणाचे प्रतिबींब शुन्य दिसते.*

*जग जवळ आणण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण अशी व्याख्या केली जाते. मात्र जागतिकीकरणातून देशादेशांमधीलच नव्हे तर देशांतर्गतही स्पर्धा वाढलेली आहे. जागतिकीकरणाने भारतातील दारिद्रय निर्मूलन तर झाले नाहीच उलट शेतकरी, शेतमजुरच नाहीसा होत चाललेला आहे. शेतकऱ्यांच्या सुपीक जमीनी वेगवेगळया प्रकल्पासाठी दिल्या गेल्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात देखील घट निर्माण झालेली आहे. अशावेळी धान्याची आयात करण्याची पाळी आली. रोजगार अभावी ग्रामीण लोंढे शहराकडे वळू लागल्याचे पदोपदी जाणवत आहे. शहरीकरणाचे वाढलेले प्रमाण हे सिध्द करीत आहे. याची दुसरी बाजू म्हणजे गलिच्छ वस्तीची निर्मीती वाढत आहे. भारतीय अर्थमं०याच्या एका निवेदनानुसार 84 कोटी भारतीयांना दोन वेळचे योग्य जेवण मिळत नाही. जागतिकीकरणाच्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेतकऱ्यांच्या जमीन देऊन पुन्हा देशात विदेश बसविण्याची प्रक्रिया आपण करीत आहोत.*

*''भारतामध्ये विदेश'' (वितमपहद`जंजम॒पजीपद॑जंजम) यामुळे भारताच्या मुळ संविधानालाच आपण मुठमाती देत*

**Please cite this Article as :**मिलींद रा. जांभुळकर , जागतिकीकरणाचे भारतीय सामाजिक संस्थेतील प्रतिबींब
**: Indian Streams Research Journal (Sept. ; 2012)**

*आहोत. याबाबत राजकीय नेत्यांना मात्र चिंता वाटत नाही. त्यातून पुन्हा सामाजिक व सांस्कृतिक विषमता वाढत आहे. जागतिकीकरणामुळे आपण राष्ट्रीयता विसरत चाललो. भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा देत आहोत. आजही आदिवासींच्या जीवनमानात उल्लेखनीय फरक पडलेला नाही. उलट ते देशोधडीला लागलेले आहे. प्रकल्पग्रस्त गावकऱ्यांचे योग्य पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत नाही. उलट शासकीय निधी श्रीमंतासाठी खर्च होतो. मोठया उद्योगपतीना सबसिडी दिली जाते. याचाच अर्थ जागतिकीकरणात भारतीय सामान्य जनतेला कोणतेही फायदे मिळालेले नाही असे म्हणावे लागेल.*

*खरे तर जागतिकीकरणात सर्वत्र शांतता, मानवाची प्रगती असा अर्थ गृहीत धरलेला होता. मात्र जागतिक शांतता दृष्टीस पडत नाही. बलाढ्य देश कमकुवत देशास पांयदळी तुडवितांना दिसतात. भारत देशात सुध्दा बहुसंख्य अल्पसंख्याक लोकांच्या भावनांचा विचार करीत नाही. माणसांचे जागतिकीकरण होतांना दिसत नाही. जागतिकीकरणात एक मोठी कंपनी दुसरी छोटी कंपनी गिळंकृत करीत आहे. म्हणजेच भांडवलाच्या हितासाठी साम्राज्यवादी जागतिकीकरण आहे. संपत्ती काहींची वाढत आहे पण सर्वांसाठी समान संधीचा अभाव दिसून येतो. मग जागतिकिकरणाने सर्वांच्या अपेक्षा, आकांक्षा पूर्ण केल्यां काय? असा प्रश्न उद्‌भवतो.*

*जागतिकीकरणाचा एक प्रभाव आपल्या देशावर पडला तो म्हणजे जागतिक वित्तीय संकट होय. आपला शेअर बाजार कोसळला. एकीकडे मॉल्स, चकाकणारे मल्टिप्लेक्स, नाईट क्लब्स तर दुसरीकडे असंख्य चिल्लर विक्रेत्यांच्या जीवन निर्वाहाचा प्रश्न दिसतो. म्हणजेच भारतात हळूहळू काही श्रीमंत व्यक्तींच्या भोगवादी संस्कृतीचा विकास होत आहे. आपल्या देशात दोन भारत दृष्टीस पडत आहे. एक म्हणजे जमीनीला विसरून आकाशाकडे झेप घेणारा व दुसरा म्हणजे आकाशाकडे ओशाळभूत नजरेने बघणारा होय. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिकीकरण धोरणाला जबाबदार ठरविले आहे. आजही भारतातील प्रत्येक राज्यात 60 टक्के पेक्षा अधिक लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगत आहे. असा निष्कर्ष अर्जून सेनगुप्ता आयोगाने काढलेला आहे. इंदिरा गांधीनी बॅंकाचे राष्ट्रीयीकरण केले. आता जागतिकीकरणात खाजगीकरणावर भर दिल्या जातो. म्हणजेच प्रवास कोणत्या दिशेने सुरू आहे, हे स्पष्ट होते.*

*आरोग्याच्या बाबतीत तर भारतापुढील आव्हाने फारच अवघड वाटतात. जागतिकीकरणाच्या प्रवाहात जवळपास 50टक्के भारतीय मुलं ही कुपोषीत आहेत. म्हणजेच भारतातील सर्वसामान्य जनतेला आरोग्यदायी जीवन जगता येत नाही. जागतिकीकरणाने लोकसंख्येचे स्थलांतर वाढले. त्यातून रोगांचे प्रमाण देखील वाढले. एड्‌स सारखा जीवघेणा साथीचा आजार हा जागतिक झाला आहे. पण खाजगीकरण तत्वामुळे वैद्यकीय सोयी गरीबांना उपलब्ध होत नाही. आजीचा बटवा ही संकल्पना नामशेष होत आहे.*

*जागतिकीकरणाचा परिणाम की एकीकडे स्त्रियांना प्रगती करण्यास नवीन मार्ग दिसतो. तर दुसरीकडे स्त्रियांना उपभोग्य वस्तू म्हणून बघीतल्या जाते. म्हणूनच साध्या जाहीराती मध्ये देखील स्त्रीच दिसते. आज कोणत्याही स्त्रीचे वक्षस्थळ, कंबर, नितंब यांचे मोजमाप स्त्री सौंदर्याचे निकष ठरत आहे. जागतिकीकरणाचा आजचा अर्थ पाश्चिमात्यीकरण झालेला आहे. पाश्चिमात्य अंधानुकरण आपल्या देशाची संस्कृती मुळ वैशिष्टये गमावून समाज व्यवस्थाच रसातळाला जाते की काय अशी शंका निर्माण होत आहे. कारण अर्थप्राप्तीसाठी स्त्री—पुरूष एकत्रीत कार्य करतात मात्र त्यातून विवाह बाहय संबंध वाढत चालेले आहे. घराची व्यवस्था पाहणारी पत्नी, सात जन्माची जोडीदार हा नियम मागे पडलेला दिसून येतो. एकंदरीत आपल्या कडील फॅशन, चंगळवाद हे जागतिकीकरणाचे सांस्कृतिक आक्रमणच म्हणता येईल.*

*जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपनीत असलेल्या विवाहयोग्य युवक युवतीची मागणी वाढलेली आहे. आज विवाह जग एक करण्याची चळवळ बनत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून विवाह संपन्न होत आहे. ''वसुधैव कुटूंबकम'' या तत्वाज्ञानाप्रमाणे कुणीही कोणत्याही देशातील युवक युवतीशी विवाह करून घेऊ शकतो. एका अर्थाने जागतिकीकरणातून ''स्वदेशी'' ही संकल्पना नष्ट होत आहे. जागतिकीकरण म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सिमांचे विलोपन ही व्याख्या अगदी सार्थ ठरत आहे. जागतिकीकरणात पैशाचे महत्व वाढल्याने आर्थिक स्वावलंबनसाठी विवाह न करण्याकडे कल सुध्दा दिसतो आहे. तर काही ठिकाणी स्वतःच्या आशा, आकांशा, अभिरूची हयांना महत्व प्राप्त होत असल्याने घटस्फोटाचे प्रमाण देखील वाढीस लागलेले दिसून येते.*

*जागतिकीकरणाचा कुटूंब संस्थेवर देखील परिणाम दिसून येतो. ''छोटे कुटूंब सुखी कुटूंब'' हा मुलमंत्र स्विकारला जात असल्याचे आढळून येते. स्वार्थ वृत्तीने तर कळस गाठला आहे. वृध्दाश्रमाची वाढती संख्या हे त्याचे निदर्शक आहे. भारतीय कुटूंब कृषीक्षेत्राशी निगडीत होते. जागतिकीकरणात यात बदल घडून आलेला आहे. पारंपारिकता नष्ट होत आहे. पेंटटच्या नावावर बहुराष्ट्रीय कंपन्याचे फावत आहे. भारतातील जवळपास 2/3 लोकांची जीविका जैव विविधतेवर अवलंबून होती. ती जागतिकीकरणामुळे नष्ट होत चाललेली आहे. भारतीय लोकांचे ज्ञान व कौशल्य लोप पावत आहे.*

*जागतिकीकरणाच्या वादळात कामगार कपात केल्या जात आहे. आधीच बेकारी, गरीबी त्यात पुन्हा वाढ होत आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक वातावरणात जगातील सर्व देश उच्च शिक्षणाची दशा व दिशा बदलण्यात गुंतलेले आहे. भारत देशातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात फार मोठे धक्कादायक बदल घडून येत आहे. पूर्वीचे शिक्षण आत्मसाक्षात्काराशी संबंधीत होते. आज त्याचा संबंध रोजगाराबरोबर जोडण्यात आलेला आहे. धंनदांडगे लोक या संधीचा उपयोग करून न घेतील यात आश्चर्य ते काय? त्यांना समाजाचे काहीही देणेघेणे नाही. फक्त आपली पोतडी भरावयाची आहे. जागतिकीकरणामुळे खाजगी परदेशी विद्यापीठे स्थापन होत आहे. म्हणजेच शिक्षणसंस्थद्वारा सार्वजनिक हिताय हा उद्‌देश नष्ट करण्याचा सपाटा सुरू झालेला आहे.*

*जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण क्षेत्र एक उद्योग झालेला आहे. जागतिकीकरणात आपली मूले मागे राहू नये असे वाटत असल्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळा हाऊसफूल तर मराठी शाळा, मातृभाषेतील शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे. परिणामतः गरीबांची मूले शिक्षण घेण्यापासून वंचित होण्याची समस्या उद्‌भवत आहे. वंचितावस्थेतून वर येण्यासाठी, प्रगती करण्यासाठी उत्तम शिक्षण हे एक प्रभावी माध्यम आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सिध्द करून दाखविलेले आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावाने आंतरराष्ट्रीय भाषेचा म्हणजेच इंग्रजीचा प्रभाव वाढत आहे. मात्र आपल्या अनेक मातृभाषा व*

बोलीभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. जेव्हा की मातृभाषाच शिक्षणाचे माध्यम असावे असे शिक्षणशास्त्रज्ञ सांगतात. म्हणजेच इंग्रजीचा डोळेझाकून स्विकार हा भारतीय समाजाचा सांस्कृतिक पराभव दर्शवितो. खरे तर व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने शिक्षणसंस्थाना मोकळीकता नको कारण अन्न, पाणी, निवारा प्रमाणे शिक्षण सुध्दा एक जीवनावश्यक बाब झालेली आले.

जागतिकीकरणात सांगितल्या जाते, आता यापुढे सर्वांना संगणकाद्वारे नोबेल पुरस्कार सन्मानित शास्त्रज्ञ शिक्षण देतील. खरोखरच हे भारत देशात शक्य आहे काय? यातून काय साध्य होईल? महागडे शिक्षण व शासनाचे नियंत्रण कमी अशा परिस्थितीत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत गरीब मूले आपोआप दूर लोटली जाणार आहेत. उच्चभ्रू वर्गास मात्र धक्का पोहचणार नाही. आजही जागतिक शिक्षणातून वैज्ञानिक विवेक सुध्दा दिसत नाही. अजूनही धार्मिक कट्टरवाद व जातीवाद कायम दिसून येतो. मग प्रश्न पडतो जागतिकीकरणाने काय साध्य झाले. आपणास खऱ्या अर्थाने आत्मपरिक्षण करण्याचीच गरज आहे. म्हणूनच अमर्त्य सेनच्या मते, राष्ट्रउभारणीसारखे शिक्षण क्षेत्र खाजगीकरणातून वगळले पाहिजे. अन्यथा समाज अधिक विकलांग व दुबळा हाईल.

जागतिक आधुनिक शिक्षणात सर्व समस्या सुटतील माणसे 'माणसा'सारखे वागू लागतील स्त्रियांना सन्मानाने वागविले जाईल. पण चित्र उलटे दिसते. म.फुले या महान समाजसुधारकाचे स्वप्न धुसर होतांना भारतात दिसत आहे. कारण जागतिकीकरणात देखील भारतीय उच्च शिक्षणाचे प्रमाणे 7.5टक्के पेक्षा पुढे नाही. दुसरी बाब म्हणजे परदेशी विद्यापीठांच्या माध्यमातून भारतात सांस्कृतिक वसाहतवाद निर्माण होत आहे. आपले शिक्षण निर्यात नाही तर आपण आयात करतो आहो. भारताच्या दृष्टीने शिक्षण हे एकमार्गी वाटत आहे.

जागतिकीकरण म्हणजे जणूकाही जादूची कांडी समजल्या जाते. पण वास्तविकता फार दूर आहे. अजूनही आपल्याकडे पुरेशी वीज नाही. प्यायचे पाणी नाही मग भारत देश महासत्तेकडे कशी वाटचाल करीत आहे हे कोडे मला अजुनही सुटलेले नाही. जागतिकीकरणाचे वारे भारतात सांगण्यासाठी निवडणूकीच्या वेळी भा.ज.प. पक्षाकडून ''इंडिया शायनिंग'' घोषणा केली. मात्र भारतीय जन समुहाने ती फोल ठरविली. तरीही जागतिकीकरणाने सांस्कृतिक आदानप्रदान वाढविले ते सिनेमा सृष्टीसाठी एवढे म्हणता येईल.

पाश्चात्य जगामधील स्वतःला कट्टर राष्ट्रवादी म्हणून घेणारे लोकही आता जागतिकीकरणाला कंटाळून गेलेले आहे. कारण जागतिकीकरण जंगलातील कायदा झालेला आहे. जो बलवान असतो तोच जंगलात टिकून राहू शकतो. याचाच अर्थ भारतातील गोर गरीब लोकांना जागतिकीकरणाचा काहीच फायदा झालेला नाही. साधारणतः जागतिकीकरण सबलांना अधिक सबल व दुर्बलांना अधिक दुर्बल करीत आहे. म्हणजेच भारत देशाचा विचार करता जागतिकीकरणाचा संपूर्ण भारतीय समाज व्यवस्थेला नव्हे तर राजकीय व्यक्ती, उद्योगपती व नोकरशाहीतील हुशार अधिकाऱ्यांना फायदा होत आहे. होणार आहे. जागतिक बाजारपेठा काबीज करण्यासाठी भारतीय उद्योगपती मागे राहिलेले नाही.

जागतिकीकरणातून नैसर्गिक संसाधनाचा गैर वापर होत आहे. आज तो जागतिक चिंतेचा विषय झाला आहे. थोडक्यात जागतिकीकरणाचा मार्ग हा विकासाचा मार्ग नसून नसून आत्मनाशाचाच मार्ग ठरतो आहे. भविष्यात पुन्हा जागतिकीकरणाच्या मागे धावणे म्हणजे मृगजळाच्या मागे धावण्यासारखे होईल. असे असले तरी जागतिकीकरणाचा खरा अर्थ समजावून घेतला आणि त्यानुसार सर्व राष्ट्रे वागली तर मानवतेचे कल्याण होऊ शकते. म्हणजेच सुयोग्य जागतिकीकरणासाठी नव्या मानसिकतेची आवश्यकता आहे.

सध्यातरी जागतिकीकरणाचा अविकसीत राष्ट्रांना कोणताही फायदा झालेला नाही. भारत देश व भारतीय समाज पूर्वीच्या इतिहासातील सोन्याचा धूर कधी निघणार याच्या प्रतिक्षेतच दिसून येतो. व्यक्ती विकासातून समाज विकास शक्य आहे. मात्र जागतिकीकरणात व्यक्तीचे स्थान नगण्य आहे. म्हणूनच न्यूयार्कच्या स्टेट विद्यापीठाचे समाजशास्त्राचे प्रा. जेम्स पेन्नास व मॅक्सिकोचे प्रा.हेन्री वेल्स रेअर आपल्या 'जागतिकीकरणाचे सत्य स्वरूप' या पुस्तकात म्हणतात की, ''जागतिकीकरणासंबंधी जितकी गोड भाषा चालू आहे तितका तो एक मुखवटा आहे.'' वर्ल्ड फोरमच्या बैठकीत भाषण करतांना फिडेल कास्तो म्हणतात की, 'जागतिकीकरण हे फार काळ टिकणार नाही. लवकरच त्याचे अस्तित्व संपेल.'' भारतीय सामाजिक संस्थाचा विचार करता जागतिककरण सर्वांना खात सुटलेला दिसून येतो. जागतिक व्यापार विश्वामुळे सामान्य माणसांची मती गुंग होत चाललेली आहे. शेवटी असेच म्हणावे लागेल की, जागतिकीकरणाचे भारतीय सामाजिक संस्थावर सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारचे प्रतिबींब बघावयास मिळत आहे.

संदर्भ :–

1) जागतिकीकरण – समस्या, आशय आणि अनुभव – सी.पं. खेर
2) देशीयता ते जागतिकीकरण – डॉ.मदन कुलकर्णी
3) सेझ नामक मृत्यूसापळा – प्रा.जैमिनी कडू
4) सांस्कृतिक अस्मिता आणि जागतिकीकरण – मकरंद साठे
5) एकविसाव्या शतकातील भारत (उन्माद आणि आव्हाने) – डॉ.आनंद तेलतुंबडे
6) उदारीकरणः नवे आर्थिक धोरण – डॉ.ना.य.डोळे
7) जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांचे प्रश्न – गोविंद पानसरे
8) मक्तेदारी भांडवलशाहीचे अरिष्ट – ए.बी.वर्धन, अनुवाद ल.स.कारखानीस
9) बदलते शिक्षण : स्वरूप आणि समस्या – डॉ.जनार्दन वाघमारे
10) भारत विकणे आहे
11) ज्ञानजगत खंड–1, अंक–1, 2010

12) चंद्रपूर चर्चासत्र : 2002
13) संवाद – मराठी समाजशास्त्र परिषद, 2006
14) लोकराज्य जून–जूलै 2011
15) लोकमत वर्तमानपत्र लेख
16) इंटरनेट

# Publish Research Article

**International Level Multidisciplinary Research Journal**

## For All Subjects

*Dear Sir/Madam,*

*We invite original unpublished research paper. Summary of Research Projetc, Theses, Books and Books Review of publication, You will be pleased to know that our journals are..*

**Associated and Indexed, India**

- *OPEN J-GATE*
- *International Scientific Journal Consortium Scientific*

**Associated and Indexed, USA**

- Google Scholar
- DOAJ
- EBSCO
- Index Copernicus
- Academic Journal Database
- Publication Index
- Scientific Resources Database
- Recent Science Index
- Scholar Journals Index
- Directory of Academic Resources
- Elite Scientific Journal Archive
- Current Index to Scholarly Journals
- Digital Journals Database
- Academic Paper Database
- Contemporary Research Index

Indian Streams Research Journal
258/34, Raviwar Peth Solapur-413005, Maharashtra
Contact: 9595359435
E-Mail- ayisrj@yahoo.in / ayisrj2011@gmail.com
Website: www.isrj.net